अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि. अहमदनगर - ४१४ ००२

९४२००५१२१३/९८५०८५५६९९

**नॅक मुल्यांकित 'बी' ग्रेड (सी.जी.पी.ए. - २.३७)**




प्राचार्य

**डॉ. सुरेश बाबर**

एम.ए.,बी.एड्.,एम.फिल.पीएच.डी.

वरिष्ठ महाविद्यालय

## माहिती पत्रक

२०२२ - २०२३

Website - www.janatacollegerui.com ▪ Email - janata@janatacollegerui.com

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज

# कार्यकारी मंडळ (गव्हर्निंग कौन्सिल)

(दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४)

| अ.नं. | नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.श्री.नंदकुमार भाऊसाहेब झावरे पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.रामचंद्र हरिभाऊ दरे | उपाध्यक्ष |
| ३. | मा.श्री.गेणूजी दगडूजी खानदेशे | सेक्रेटरी |
| ४. | मा.ॲड.विश्वासराव दत्तात्रय आठरे | सहसेक्रेटरी |
| ५. | मा.डॉ.विवेक प्रभाकर भापकर | खजिनदार |
| ६. | मा.डॉ.मोहनराव गंगाराम हापसे | विश्वस्त |
| ७. | मा.ॲड.दिपलक्ष्मी संभाजीराव म्हसे | विश्वस्त |
| ८. | मा.श्री.मुकेश माधवराव मुळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री.सिताराम विठ्ठलराव खिलारी | विश्वस्त |
| १०. | मा.श्री.जयंत कृष्णराव मोरे | विश्वस्त |
| ११. | मा.श्री.जयंत रामनाथ वाघ | विश्वस्त |
| १२. | मा.ॲड.माणिकराव नामदेवराव मोरे | विश्वस्त |
| १३. | मा.ॲड.वसंतराव शाहूराव कापरे | सदस्य |
| १४. | मा.प्रा.श्री.अर्जुनराव तात्याभाऊ पोकळे | सदस्य |
| १५. | मा.सौ.अरुणा अशोकराव काळे | सदस्या |
| १६. | मा.डॉ.अभय गेणूजी खानदेशे | सदस्य |
| १७. | मा.श्री.राहुल नंदकुमार झावरे | सदस्य |
| १८. | डॉ.बाळकृष्ण देवराम मरकड | सदस्य |
| १९. | श्री.दिपक रामचंद्र दरे | सदस्य |
| २०. | श्री.शंतनू मोहनराव हापसे | सदस्य |

# - अनुक्रमणिका -


- प्राचार्यांचे मनोगत
- प्रवेश घेण्यापूर्वी
- पदवी अभ्यासक्रम व विषय निवड
- प्रवेश पध्दती
- भौतिक सुविधा व विविध उपक्रम
- विद्यार्थी कल्याण विविध योजना
- शिस्त पालन व अनुशासन
- शुल्क विषयक व इतर नियम
- ए.टी.के.टी. विषयक नियम
- ॲन्टी रॅगिंग कमिटी
- प्रवेश फी सूचना
- विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता

# प्राचार्यांचे मनोगत



**डॉ. सुरेश बाबर**

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

वेगवेगळे आयुष्य जगण्याची उमेद बाळगून आपण महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करत आहात, त्याबद्दल आपले मन:पूर्वक स्वागत. अन्न, वस्त्र आणि निवारा त्याबरोबरच शिक्षण आणि आरोग्य या मानवी जीवनातील आवश्यक बाबी आहेत. म्हणूनच हुतात्मा चौथे शिवाजी महाराज यांच्या बलिदानातून आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेतून उभ्या राहिलेल्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर या आपल्या संस्थेने रुईछत्तिसीच्या परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांच्या मुलामुलींच्या उच्च शिक्षणासाठी या महाविद्यालयाची उभारणी केली आहे.

ग्रामीण भागातील व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उदात्त दृष्टीकोनातून संस्थेने दि. २० जुलै २०१२ रोजी या महाविद्यालयाची स्थापना केली. शिक्षण हे जीवनोध्दाराचे सर्वाधिक प्रबल माध्यम आहे हे ओळखून ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या सर्वांगिण विकासाबरोबर त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचा मानस हा या महाविद्यालयाच्या स्थापने पाठीमागचा प्रमुख उद्देश आहे. विनाअनुदानीत असताना सुध्दा संस्थेच्या मान्यवर पदाधिकाऱ्यांनी सर्वोतोपरी सहकार्यातून प्रशस्त व सर्व सुविधाने सुसज्ज इमारत बांधली असून सध्या या महाविद्यालयात एकूण ६०९ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा व त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न व समृध्द व्हावे म्हणून विविध उपक्रम राबविले जात आहे. सुरुवातीपासूनच आपल्या महाविद्यालयाचा निकाल सातत्याने उत्कृष्ट राहिल्यामुळे महाविद्यालयाचा विकास झपाट्याने होत आहे.

आपल्या महाविद्यालयास नेहमी स्थानिक सदस्यांची व शिक्षण प्रेमींचे सहकार्य लाभत आहे. महाविद्यालयात वेळोवेळी सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, व्याख्यानमाला, स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन यासारखे विविध स्पर्धांचे आयोजन करुन सर्वांगीण विकास घडवून आणला जात आहे. महाविद्यालयात सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय तसेच विविध खेळांचे साहित्य उपलब्ध आहे. नियमित

अभ्यासक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका यासारख्या विविध योजना राबविल्या जातात. या महाविद्यालयाची उभारणी झाल्यामुळे येथील ग्रामीण भागातील मुलींची शिक्षणाची सोय झालेली आहे.

महाविद्यालयाने अल्पावधीत नॅक मूल्यांकनामध्ये (CGPA - 2.37) 'B' Grade प्राप्त केली असून भविष्यामध्ये महाविद्यालयात वाणिज्य, बी.एस्सी. (संगणक) व एम.एस्सी. (रसायनशास्त्र) नव्याने सुरु करण्याचा संस्थेचा मानस आहे. या बरोबरच विद्यार्थ्यांची व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी लहान लहान अद्ययावत् कोर्सेस महाविद्यालय उपलब्ध करण्यात येणार आहेत. ज्यामुळे सध्याच्या व भावी जीवनातील बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत आपल्या अपेक्षा पूर्ण होतील.

विकासाच्या प्रत्येक मार्गात शिस्त ही महत्वाची गुरुकिल्ली आहे. या कॉलेजच्या माध्यमातून तुमचा शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यक्तिगत क्रीडात्मक विकास निश्चित घडून येईल. पण हे सर्व साध्य करण्यासाठी आपल्याला कडक स्वयंशिस्तीची गरज आहे.

या महाविद्यालयातील आपल्या प्रवेशाचा निर्णय हा अत्यंत अचूक निर्णय आहे, कारण तुमचे स्वप्न हे केवळ तुमचे राहिले नाही तर ते महाविद्यालयाचे स्वप्न आहे. या महाविद्यालयातील शिक्षण तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कटिबध्द आहेत. आजच्या काळासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे ज्ञान आम्ही तुम्हाला निश्चितपणे देण्यासाठी प्रयत्न करु यात शंका नाही.

प्रस्तुत महाविद्यालय आपल्या विकासासाठीच उभे आहे. या महाविद्यालयात आपले हार्दिक स्वागत....

धन्यवाद...!

**डॉ. सुरेश बाबर**
एम.ए.,बी.एड्.एम.फिल.पीएच.डी.
**प्राचार्य**

# प्रवेश घेण्यापूर्वी ...

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ/महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या तारखेपर्यंत नियमानुसार विविध अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जाईल.

२. प्रवेशाची पूर्वतयारी म्हणून खालील कागदपत्रांची पूर्तता प्रवेशापूर्वी करुन ठेवणे आवश्यक आहे.

   अ) शाळा सोडल्याचा दाखला व पाच साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती

   ब) मागील वर्गाच्या परीक्षेच्या प्रत्येक गुणपत्रकाच्या पाच साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती

   क) शिक्षणात खंड (गॅप) असेल तर ॲफेडेव्हीट व दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती.

   ड) मागासवर्गीय विद्यार्थ्याने मा.तहसीलदार यांच्याकडून घेतलेला जातीचा दाखल्याच्या पाच साक्षांकित झेरॉक्स प्रती.

   इ) मागील ३ वर्षांचा उत्त्पन्नाचा दाखला.

   ई) पासपोर्ट साईजचे अलिकडे काढलेले पाच फोटो.

   उ) दुसऱ्या महाविद्यालयातून ह्या महाविद्यालयात नव्याने प्रवेश घ्यावयाचा असल्यास पूर्वीच्या महाविद्यालयात मिळत असलेल्या आर्थिक सवलतीचा किंवा शिष्यवृत्तीचा मंजूरी आदेश क्रमांक व एक प्रमाणित झेरॉक्स प्रत, तसेच ना हरकत प्रमाणपत्र.

३. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपत्रक पूर्ण वाचावे.

४. प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात भरलेला असावा व प्रवेश घेताना स्वत: उपस्थित असणे अनिवार्य आहे.

५. प्रवेशाच्या जागा मर्यादित असल्याने सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन मुदतीत प्रवेश पूर्ण करावा.

६. प्रवेश घेण्यापूर्वी प्राध्यापकांचे मार्गदर्शन व स्वत:चा कल लक्षात घेऊन विषय निवड करावी. एकदा निवडलेले विषय परस्पर बदलू नयेत. प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त १५ दिवसांच्या आत (दोन्ही दिवस धरुन तसेच यामध्ये सुट्टीचे दिवस गणले जातील.) जागा उपलब्ध असल्यास विषय बदल करता येईल. त्यासाठी प्रत्येक विषयासाठी विद्यापीठ नियमाप्रमाणे रु. २००/– फी आकारण्यात येईल.

७. शाळा सोडल्याचा दाखला महाविद्यालयात देण्यापूर्वी त्याच्या पुरेशा सत्यप्रती साक्षांकित करुन स्वत:कडे ठेवाव्यात. महाविद्यालयाकडून कोणतेही मूळ कागदपत्रे किंवा सत्यप्रती परत केल्या जात नाहीत.

८. प्रथम वर्ष कला/विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणी करुन मेडिकल चेकअप फॉर्मस् दिलल्या मुदतीतच महाविद्यालयाकडे जमा करावेत.

९. प्रवेशासंदर्भात सूचना फलकावरील सूचना विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वाचणे आवश्यक आहे.

१०. विद्यापीठ व महाविद्यालयाच्या सर्व नियमाचे पालन करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहे.

# शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

## पदवी अभ्यासक्रम आणि विषय निवड

### ▪ कला शाखा ▪

### प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)

**अनिवार्य / सक्तीचे विषय**

१) इंग्रजी
२) शारीरिक शिक्षण
३) लोकशाही निवडणुका आणि प्रशासन

**ऐच्छिक विषय :- (खालीलपैकी कोणतेही पाच विषय निवडावेत)**

१) मराठी
२) हिंदी
३) इंग्रजी (ऐच्छिक)
४) इतिहास
५) भूगोल
६) राज्यशास्त्र
७) अर्थशास्त्र

### द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)

**अनिवार्य / सक्तीचे विषय**

१) इंग्रजी
२) आधुनिक भारतीय भाषा (मराठी/हिंदी)
३) पर्यावरण जाणीव जागृती

**सामान्य व विशेष स्तरावरील विषय**

टीप - S.Y.B.A. वर्गात जो विषय विशेष स्तरावर (DSE) निवडला असेल त्याचा सामान्य स्तरावरील (CC) विषय व SEC विषय अनिवार्य आहे.

१. खालीलपैकी कोणताही एक विषय विशेष स्तरावर निवडावा.
२. जो विषय विशेष स्तरावर निवडला असेल त्याचे १ - CC , २ - DSE व १ - SEC असे विषय असतील.
३. विशेष स्तरावर निवडलेल्या विषयाव्यतिरिक्त अन्य दोन विषय सामान्य स्तरावर निवडावेत.

१. मराठी २. हिंदी ३. इंग्रजी ४. इतिहास ५. भूगोल ६. राज्यशास्त्र ७. अर्थशास्त्र

### तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.)

**अनिवार्य / सक्तीचे विषय**

द्वितीय वर्षात घेतलेले सामान्य व विशेष स्तरावरील सर्व विषय तृतीय वर्षासाठी तसेच राहतील. यासोबत जेनरिक एलेक्टिव हा विषय सक्तीचा आहे.

# शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

## पदवी अभ्यासक्रम आणि विषय निवड

### ■ विज्ञान शाखा ■

**प्रथम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.)**

१) भौतिकशास्त्र (P) / भूगोल (G)
२) रसायनशास्त्र (C)
३) वनस्पतीशास्त्र (B)
४) गणित (M) / प्राणीशास्त्र (Z)
५) शारीरिक शिक्षण
६) लोकशाही निवडणुका व प्रशासन (DEG)

१. PCBZ  २. PCBM  ३. CBZG  **यापैकी कुठलाही एक ग्रुप निवडावा.**

**द्वितीय वर्ष विज्ञान (S.Y.B.Sc.)**

१) PCM  २) PCB  ३) CBZ  ४) CBG

**अनिवार्य विषय**

१) पर्यावरण जागृती अभ्यासक्रम
२) मराठी / इंग्रजी

**तृतीय वर्ष विज्ञान (T.Y.B.Sc.)**

**खालीलपैकी कुठलाही एक विषय विशेष स्तरावर निवडावा.**

१) भौतिकशास्त्र (P)  २) रसायनशास्त्र (C)  ३) वनस्पतीशास्त्र (B)

**महत्त्वाची सूचना –** १. कला व विज्ञान शाखेची पदवी प्राप्त करण्यासाठी चार क्रेडीट खालील उपक्रमांतील सहभागातून मिळवणे अनिवार्य आहे.

a. NSS  b. क्रीडा  c. अविष्कार  d. शोधनिबंध  e. शैक्षणिक सहल
f. सर्व्हेक्षण  g. ऑनलाईन सर्टिफिकेट कोर्स

**■ अत्यंत महत्वाचे ■**

**२०२० – २०२१ पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. प्रवेशासाठी संकेतस्थळ**
**http://janatacollegerui.com / admission.form.php**

# प्रवेश पध्दती

प्रत्येक विद्यार्थ्यांने प्रवेश घेण्यापूर्वी पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) प्रत्येक विद्यार्थ्यांने प्रवेश घेण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचावे.
२) प्रवेशासाठी फक्त महाविद्यालयांकडून दिला जाणारा प्रवेश अर्जच स्विकारला जाईल.
३) गुणवत्ता यादीनुसार दिलेल्या नियोजित वेळेत प्रवेश घ्यावा.
४) प्रत्येक विद्यार्थ्यांने ओळखपत्रावर आपला नवीन फोटो योग्य ठिकाणी चिकटवावा. ओळखपत्र मिळाल्यानंतर त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी. आणि नमूद केलेल्या जागेवर स्वत:ची स्वाक्षरी करावी.
५) प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना १२ वीचे मुळ गुणपत्रक आणि त्याच्या पाच साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती द्याव्यात.
६) अन्य शाळा महाविद्यालयामधून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) देणे आवश्यक आहे.

# पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate)

१) प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस पुणे विद्यापीठचे पात्रता प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.
२) ज्या विद्यार्थ्यांनी पुणे बोर्डाशिवाय इतर बोर्डमधून १२ वी ची परीक्षा दिलेली असेल त्यांनी त्या संबंधित बोर्डाकडील पासिंग सर्टिफिकेट देणे आवश्यक आहे.
३) पुणे विद्यापीठाशिवाय अन्य विद्यापीठ अथवा संस्थेतून आलेल्या विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज भरणे आवश्यक आहे. पुणे विद्यापीठाच्या पात्रता प्रमाणपत्राशिवाय परीक्षेस बसता येणार नाही. त्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.
   १) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट)
   २) उत्तीर्ण प्रमाणपत्र (पासिंग सर्टिफिकेट)
   ३) हजेरी संबंधी प्रमाणपत्र (अॅटेडन्स सर्टिफिकेट)
   ४) गुणपत्रक (मार्कशीट)
   ५) प्राचार्यांनी स्वाक्षरी केलेल कॅरेक्टर सर्टिफिकेट

## शाळा सोडल्याचा दाखला व स्थलांतर प्रमाण (T.C./Migration Certificate)

१) पुणे विद्यापीठाशिवाय अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेतांना स्थलांतरण प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.
२) शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) हातात दिला जात नाही. जर विद्यार्थी/विद्यार्थ्यांनी हे महाविद्यालय सोडून अन्य महाविद्यालय/संस्थेत प्रवेश घेतला असेल तर संबंधित महाविद्यालय/संस्थेत टी.सी. पाठविला जातो.

# सर्व सामान्य सूचना

* प्रत्येक विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती ७५% असल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही.
* वेगवेगळ्या शाखांसाठी आकारले जाणारे शुल्क/फी महाराष्ट्र शासन आणि पुणे विद्यापीठाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन आकारले जाईल.
* खालील प्रकारच्या वर्तन प्रकारांच्या बाबतीत दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.
   १) सत्रांत परीक्षेस अनुपस्थित राहिल्यास २) परीक्षा फॉर्म वेळेत न भरल्यास ३) महाविद्यालयाच्या आवारात कोणत्याही प्रकारचे नुकसान केल्यास ४) कोणत्याही प्रकारचे बेशिस्त वर्तन आढळल्यास

## भौतिक सुविधा

१) **इमारत** (Building) – महाविद्यालसाठी आवश्यक असणारी प्रशस्त व सर्व सुविधासह सुसज्ज इमारत असून या नव्या इमारतीमध्ये ग्रंथालय, कार्यालय, संगणक प्रयोगशाळा, भाषा प्रयोगशाळासाठी स्वतंत्र कक्ष आहेत.

२) **प्रयोगशाळा** (Laboratory) – विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र तसेच भूगोल विभागांसाठी पाणी, वीज, गॅस तसेच आधुनिक उपकरणांनी युक्त स्वतंत्र प्रयोगशाळा आहेत.

३) **वनस्पतीशास्त्र उद्यान** (Botanical Garden) – वनस्पतीशास्त्र व भूगोल या विषयाच्या अध्ययनासाठी व प्रत्यक्ष प्रयोगांसाठी महाविद्यालयाने अद्ययावत् वनस्पतीशास्त्र व भूगोल उद्यान विकसित केले आहे. त्यात विविध औषधी वनस्पतींचा समावेश आहे.

४) **ग्रंथालय** (Library) – उच्च शिक्षणात ग्रंथालयाचे महत्व अनन्य साधारण आहे. त्यादृष्टीने ग्रंथालयाची वाटचाल चालू आहे. ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणारी पुस्तके व अन्य सर्व संदर्भ ग्रंथाचा संग्रह करण्यात आला आहे. ग्रंथालयात ग्रंथ नियतकालिके, वृत्तपत्रे तसेच इंटरनेट सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिली जातात.

५) **क्रीडा विभाग** (Gymkhana) – महाविद्यालयाचा क्रीडा विभाग विद्यार्थ्यांच्या बौध्दिक शारीरिक विकासासाठी अत्यंत महत्वाचा आहे. महाविद्यालयाचे क्रीडांगण भव्य व प्रशस्त असून विभागामध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, खो–खो तसेच भाला फेक, इ. मैदानी व वैयक्तिक स्पर्धांसाठी सुविधा उपलब्ध आहे. क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य विद्यार्थ्यांसाठी पारितोषिके दिली जातात.

## विविध उपक्रम

१) **राष्ट्रीय सेवा योजना** (N.S.S.) – राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये सामाजिक व राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या योजनेमध्ये निवडक विद्यार्थ्यांना समाविष्ट केला जातो. या उपक्रमातून सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता, वृक्षारोपण व संवर्धन रक्तदाब, एडस् विरोधी सामाजिक जागृती परिवर्तन, व्यक्तिमत्व विकास, राष्ट्रीय कर्तव्य, नेतृत्व वृध्दी, स्त्री–पुरुष समानता साक्षरता उपक्रम, बालकामगार सर्वे, भौगोलिक स्थान निश्चित व सामाजिक आर्थिक सर्वेक्षण याच बरोबर राष्ट्रीय सेवा योजना पुणे विद्यापीठाने जे उपक्रम आखले ते सर्व कार्यक्रम एन.एस.एस. राबविते. इतर ठिकाणच्या विविध उपक्रमासाठी निवडक विद्यार्थी पाठविले जातात.

प्रवेशांची संख्या : १०० इतकी असून वर्षभरामध्ये १२० तास सामाजिक/सामूहिक कार्य करावे लागते. तसेच ७ दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबिर घेतले जाते. यातून जिल्हा, विद्यापीठ व राष्ट्रीय पातळीवरील शिबिरांसाठी उत्कृष्ट स्वयंसेवकांची निवड केली जाते. एन.एस.एस. या उपक्रमासाठी सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अध्यादेश १६३ नुसार वार्षिक परीक्षेमध्ये अधिक ५ गुण दिले जातात.

**२) शिक्षक संघ** – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि शिक्षक–पालक–विद्यार्थी यांच्यात समन्वय साधण्यासाठी पालक संघ स्थापण्यात आला. परिसरच्या गरजा, रोजगार संधी, नवीन अभ्यासक्रम व उपक्रम याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व वर्तमान जीवनातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थी सबल, समर्थ व्हावा त्याचा आत्मविश्वास वाढावा त्याची प्रगती व्हावी. हा दृष्टीकोन समोर ठेवून पालकसंघ कार्यरत आहे. विद्यार्थ्यांमध्ये संगणक साक्षरता निर्माण करण्यासाठी पालकसंघ कार्यरत आहे. पालकांच्या बैठका होतात. त्यामध्ये विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास, शिक्षण विस्तार, लोकशिक्षण इ. उपक्रमांबाबत विचार विनिमय केला जातो व महाविद्यालय प्रशासनास मौलिक सूचना केल्या जातात.

**३) तक्रार निवारण कक्ष** – महाविद्यालयामध्ये शिस्त व अनुशासन रहावे यासाठी महाविद्यालयीन विविध घटकांबाबत किंवा नियमांच्या उल्लंघनाबाबत काही तक्रार असल्यास तक्रार निवारण कक्षाद्वारे विद्यार्थी,कर्मचारी,शिक्षक यांना परस्पर विरुध्द तक्रार दाखल करता येईल. संबंधित घटकांस आपली तक्रार लेखी स्वरुपात सूचना पेटीमध्ये टाकता येईल. सदर समिती तक्रारीची दखल घेऊन तक्रार निवारण करील अथवा दोषींवर योग्य ती दंडात्मक कार्यवाहीकेली जाईल.

**४) विज्ञान मंडळ (Science Association)** – आजचे युग विज्ञानाचे युग आहे. एकविसाव्या शतकात यशस्वी होण्यासाठी मानवाला विज्ञानीच कास धरावी लागेल. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वृध्दिंगत व्हावा यासाठी विज्ञान मंडळ कार्यरत असते. विज्ञान मंडळाच्या वतीने विज्ञान विषयक निबंध स्पर्धा, तज्ज्ञ व्यक्तिंची व्याख्याने, भित्तीचित्र स्पर्धा, वैज्ञानिक सहली, स्पर्धा परीक्षा इ. उपक्रम आयोजित केले जातात. तसेच विज्ञान मंडळाच्या वतीने 'राष्ट्रीय विज्ञानदिन' साजरा केला जातो. विविध स्पर्धा आयोजित करुन विज्ञान दिनाच्या दिवशी विद्यार्थ्यांला प्रमाणपत्र व बक्षिसे दिली जातात.

**५) सामाजिक शास्त्र मंडळ (Social Science Association)** – या मंडळावर सामाजिक, राजकीय, आर्थिक लोकतांत्रिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवर व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रदर्शन इ. सामाजिक उद्‍बोधन केले जाते. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करण्याचे महत्वपूर्ण काम हे मंडळ करते.

**६) शैक्षणिक सहल** – शैक्षणिक उपक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग असल्याने ऐतिहासिक, भौगोलिक, निसर्गरम्य स्थळे, उद्योग केंद्रे, संशोधन संस्था, इत्यादी भेट देण्यासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन अनिवार्य असून त्यासाठी विद्यापीठ स्तरावरील पर्यायामध्ये २ क्रेडिटचा अर्तंभाव केला आहे.

**७) विद्यार्थी संसद** – विद्यार्थी संसद हे विद्यार्थ्यांचे कृतिशील व्यासपीठ कायद्याने निश्चित केलेल्या आराखड्यानुसार विद्यार्थी संसद तयार करुन महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांच्या नियोजनात त्यांचा सहभाग घेतला जातो. त्यातून विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव दिला जातो.

**८) व्यसनमुक्ती अभियान** – विडी, तंबाखू, गुटखा आदी पदार्थांचे सेवन टाळण्यासाठी महाविद्यालयात व्यसनमुक्ती अभियान चालविले जाते. व्यसनमुक्ती प्रचार, प्रसाराचा कार्यकर्ता असावा म्हणून त्याच्यासाठी वैद्यक तज्ञांचे समुपदेशकाचे मार्गदर्शन उपलब्ध केले जाते. महाविद्यालय परिसरात व्यसनी पदार्थांचे सेवन करणाऱ्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना दंड केला जातो.

**९) सांस्कृतिक मंडळ –** महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या कलागुणांचा अविष्कार करण्यासाठी सांस्कृतिक मंडळ कार्यशील असते. विद्यार्थ्यांच्या गायन, अभिनय, वादन, विनोदबुध्दी, प्रगल्भता या गुणांना व्यासपीठ मिळावे म्हणून नाटक, एकांकिका, नाट्यछटा, एकपात्री प्रयोग, पथनाट्य या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. चालू घडामोडी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक ज्वलंत प्रश्नांवर आपले परखड मत मांडता येते. म्हणून वादविवाद स्पर्धा घेण्यात येतात. तसेच त्या–त्या वर्षी काही विशेष उपक्रम असतील तर त्यांचें आयोजन केले जाते. जेणे करुन सांस्कृतिक मूल्ये, पंरपरा इ. विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली जातील व त्यांच्याकडून नवनिर्मिती व्हावी म्हणून प्रयत्न केले जातील.

**१०) पर्यावरण जाणीव जागृती –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एस.वाय.बी.एस्सी. या वर्गासाठी पर्यावरण जाणीव जागृती हा सक्तीचा विषय सुरु केला आहे. पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी या उद्देशाने या विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना पर्यावरणाशी संबंधित प्रकल्प तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. पर्यावरण अभ्यासातील मुद्यांना अनुसरुन तज्ञांची व्याख्याने आयोजित केले जातात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी कार्यशील, चर्चासत्रे आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना प्रकल्प तयार करतांना क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते.

**११) संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास योजना –** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास घडवून आणल्यास त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील यामध्ये मुलाखत तंत्र, प्रेरणा, गट चर्चा, प्राणायाम–ध्यान आदि विषयांवर तज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. प्रत्येक शिबीराचा कालावधी १० दिवसांचा असेल.

**१२) विद्यार्थिनी मंच –** या मंच्या विद्यार्थिनींसाठी पुढील उपक्रम राबविण्यात येतील. (अ) विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास : तज्ञांची व्याख्याने, शिबिर, स्वयंरोजगार मार्गदर्शन, विविध विषयांवर निर्भयपणे, मोकळेपणे वावरत यावे. त्यांचा आत्मविश्वास वाढावा याकरिता या अभियानाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येतील. (क) हिमोग्लोबीन तपासणी : आरोग्याची योग्य ती काळजी न घेतल्याने मुलींना अनेक शारिरीक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यामध्ये आरोग्याविषयी जागृती निर्माण होण्याकरिता सर्व मुलींची हिमोग्लोबीन तपासणी, रक्तगट चाचणी करुन वैद्यकीय सल्ला दिला जातो.

**१३) I.Q.A.C. कमिटी (Internal Quality Assurance Cell)** – नॅक कमिटीला सामोरे जाण्यासाठी या कमिटीची स्थापना केलेली असून त्याचे काम नॅकच्या नियमावलीनुसार सुरु आहे.

**१४) संशोधन विभाग –** शैक्षणिक वर्ष २०१४–१५ पासून आपल्या महाविद्यालयामध्ये संशोधन विभाग कार्यरत आहे. आपल्या महाविद्यालयातून ११ विद्यार्थी **(Zonal Level)** तर दोन विद्यार्थिंनी विद्यापीठस्तरीय तसेच राज्यस्तरीय आपल्या संशोधनाचा प्रकल्प सादर केले व आपल्या महाविद्यालयाचे नाव उंचावले.

**१५) माजी विद्यार्थी संघ –** महाविद्यालयातून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी संघ असून प्रत्येक वर्षी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला जातो. महाविद्यालयाच्या भावी प्रगतीविषयी व विविध उपक्रमांविषयी चर्चा केली जाते.

# ❊ विद्यार्थी कल्याण : विविध योजना ❊

शिक्षण हे विद्यार्थ्यांना शरीर, बुध्दी, भावना, व्यावसायिक कौशल्ये, कलात्मक संवेदना व जीवनमूल्यांसंबंधी जाणीव विकसित करण्याचे साधन आहे. विद्यार्थी शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगीण विकास करणे हा उच्च शिक्षणाचा उद्देश आहे. एक समर्थ आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यार्थी कल्याण मंडळ व महाविद्यालयीन कल्याण मंडळ यांच्या अर्थसहाय्याने महाविद्यालयात पुढील योजना कार्यरत आहेत. या योजनांचा पुरेपुर फायदा घेण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा.

**१) विद्यार्थी सुरक्षा योजना** – महाविद्यालयात येणारा विद्यार्थी अपघातग्रस्त झाल्यास त्याला मदत करण्यासाठी पुढील योजना कार्यन्वित आहेत.

**अ) विद्यार्थी विमा योजना –** अपघाती निधन किंवा अपघातामुळे निर्माण झालेले अपंगत्व यासाठी विमा योजनेतून अर्थसहाय्य दिले जाते. अपघातील निधनासाठी रु. १,००,०००/– व अपघातानंतरच्या औषधोपचारासाठी रु. ५,०००/– विमा कंपनीकडून नुकसान भरपाई म्हणून दिली जाते. त्यासाठी योग्य कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

**ब) आपत्कालीन सहाय्य –** अपघातामुळे विद्यार्थ्यास इजा पोहोचल्यास त्याला तातडीने अर्थसहाय्य मिळावे म्हणून पुणे विद्यापीठाकडून हे सहाय्य देण्यात येते. त्यासाठी योग्य तो प्रस्ताव प्राचार्यामार्फत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे.

**२) विद्यार्थी आरोग्य योजना** – महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याबरोबरच त्याचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आरोग्य विषयक तपासण्या करण्यात येतात. व त्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला देण्यात येतो. विद्यार्थ्यांसाठी आरेग्य योजनेअंतर्गत पुढील उपक्रम राबविले जातात.

अ) प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी

ब) रक्त गट तपासणी

क) विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबीन आणि रक्तगट तपासणी केली जाते.

**३) स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र** – या विभागामार्फत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या माहिती दिली जाते. त्याचबरोबर या परीक्षांसाठी तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. यामध्ये विशेषत: विकास, मुलाखतीचे तंत्र, नोकरीच्या संधी व स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केली जातात.

**४) विशेष मार्गदर्शन योजना** – अभ्यासक्रमात असलेल्या कठीण वाटणाऱ्या विषयाबाबत असलेला न्यूनगंड कमी व्हावा, विषयाबाबत आत्मविश्वास वाढावा म्हणून अवघड विषयांच्या तासांच्या सरावांचे विशेष आयोजन करुन या गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**५) कमवा आणि शिका योजना** – पुणे विद्यापीठ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'कमवा व शिका' योजनेत आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी विविध विभागातून कामे देऊन आर्थिक मदत केली जाते. ''ज्ञान बनो कर्मशील कर्म ज्ञानवान'' या पुणे विद्यापीठाच्या गीतेतील पंक्तीचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव येतो.

# शिस्त पालन व अनुशासन

महाविद्यालयाच्या परिसरांत व बाहेर शिस्त अनिवार्य आहे. शिस्तभंगबद्दल दंडात्मक कार्यवाही केली जाईल. खालील बाबी शिस्तभंगाच्या समजण्यात येतील.

१) ओळखपत्राशिवाय महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रवेश २) गोंधळ घालणे ३) भांडण व शिवीगाळ करणे. ४) विद्यार्थिनींची छेडछाड करणे. ५) कर्मचारी व प्राध्यापकांशी उध्दटपणे वागणे. ६) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ परिषद ठराव क्र. ४६/४८ दि. १२ मार्च १९९८ नुसार महाविद्यालयाच्या आवारात व वर्गामध्ये गुटखा, तंबाखूचे सेवन करणे. ८) महाविद्यालयाच्या प्रांगणात - इमारत (डेस्क) फलक, रस्ता आणि अन्य वस्तूंवर असभ्य, अश्लिल लिहिणे व चित्र काढणे. ९) तासिका चालू असतांना व्हरांड्यात हिंडणे, बोलणे अथवा गोंधळ घालणे. १०) महाविद्यालयात परवानगीशिवाय सहलींचे आयोजन करणे. ११) अनाहूत पाहुणे व मित्र यांना महाविद्यालयात घेऊन येणे. व्हरांड्यात व वर्गात प्रवेश करणे. १२) महाविद्यालयीन उपक्रमांसाठी पुर्वपरवानगी शिवाय अध्यक्ष, परीक्षक किंवा वक्ता बोलविणे.

## ❊ प्रवेश रद्द करणे व फी परतावा ❊

१) प्रवेश रद्द केल्यास फक्त शिक्षण शुल्क व प्रयोगशाळा शुल्क पुढीलप्रमाणे कपात करुन परतावा मिळेल. इतर कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

| कालावधी | परतावा |
|---|---|
| **१. प्रवेश घेतल्यानंतर १ ते १० दिवसात प्रवेश रद्द केल्यास** | **२०% कपात** |
| **२. प्रवेश घेतल्यानंतर ११ ते ३० दिवसात प्रवेश रद्द केल्यास** | **४०% कपात** |
| **३. प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास** | **१००% कपात** |

२) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केल्यास त्यास पुढीलप्रमाणे शिक्षण शुल्क व प्रयोग शाळा शुल्क नव्याने भरावा लागेल.

| कालावधी | परतावा |
|---|---|
| **१. प्रवेश घेतल्यानंतर १ ते १० दिवसात प्रवेश रद्द केल्यास** | **२०% कपात** |
| **२. प्रवेश घेतल्यानंतर ११ ते ३० दिवसात प्रवेश रद्द केल्यास** | **४०% कपात** |
| **३. प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास** | **१००% कपात** |

## शुल्कविषयक नियम

१. महाविद्यालयाचे सर्व प्रकारचे शुल्क ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी भरावे लागेल.
२. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% पेक्षा कमी भरल्यास त्या विद्यार्थ्यांस शैक्षणिक सत्राचे शुल्क भरावे लागेल.
३. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास शिष्यवृत्ती रक्कम मिळणार नाही.
४. प्रवेश घेतल्यानंतर पहिल्या सत्रात प्रवेश रद्द केल्यास सत्राचे शुल्क एकरकमी भरावे लागेल.
५. महाविद्यालयात शुल्क भरतेवेळी पावती घ्यावी. पावतीशिवाय शुल्क भरु नये. नंतर तक्रार ऐकली जाणार नाही.
६. पैसे भरल्याची नोंद (दिनांक, पावती क्रमांक व रक्कम) विद्यार्थी पत्रकावर करुन घ्या.
७. आर्थिक बाबींबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास प्राचार्यांना त्वरीत भेटा.
८. प्रवेशाच्या वेळी शुल्क भरणेबाबत माहिती व नियम सूचना फलकावर लावली जाते.
९. पुणे विद्यापीठ/महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार शुल्क प्रकार व रकमेत बदल होऊ शकेल. त्याप्रमाणे फी भरावी.

## ग्रंथालयाचे/वाचनालयाचे/अभ्यासिकेचे नियम

१. महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच ओळखपत्र व एक ग्रंथालय कार्ड प्रवेश पावती दाखवून मिळेल. सदर कार्डवरील माहिती पूर्ण भरुन फोटो चिकटवून स्वाक्षऱ्या घ्याव्यात. डुप्लीकेट कार्डसाठी नियमाप्रमाणे फी भरुन कार्ड मिळेल.
२. वाचक कार्डावर ठरवून दिलेल्या दिवशीच ग्रंथ दिले व घेतले जातील. सात दिवसापेक्षा अधिक काळ ग्रंथ ठेवता येणार नाही. सात दिवसांपेक्षा पुढील दिवसास एक रुपयाप्रमाणे दंड आकारला जातो.
३. ग्रंथ घेतल्यावर वाचक कार्ड ग्रंथालयात राहील व ग्रंथ परत केल्यानंतर ते परत मिळेल.
४. ग्रंथ घेतांना वाचक कार्डावर दिनांक, नाव लिहून आपली सही करावी. तसेच ग्रंथ परत करतांना जमा झाल्याची खात्री करावी.
५. ग्रंथालयातून ग्रंथ घेताना तपासून घ्यावा. काही दोष आढळल्यास लगेच ग्रंथालय सहाय्यकाचे निदर्शनास आणावे.
६. ग्रंथावर खूण करणे, पान फाडणे, मजकूर लिहिणे, डाग पाडणे किंवा अन्य प्रकारे ग्रंथ खराब करणे नियम–बाह्य आहे. तसे झाल्यास किंवा हरवल्यास ग्रंथाची दिडपट किंमत भरावी लागेल.
७. अभ्यासिकेतील नियतकालिके वा अन्य साहित्यासाठी ओळखपत्र ठेवावे लागेल. हे साहित्य घरी नेता येणार नाही.
८. ग्रंथालयाच्या सूचना फलकावरील सूचना नियमित पहाव्यात.
९. परीक्षेपूर्वी ग्रंथालयाचे ग्रंथ परत करुन ना बाकी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. माहिती पुस्तकाच्या शेवटी क्लिअरन्स फॉर्म दिला आहे.
१०. ग्रंथालयात शांतता पाळावी ग्रंथालयाचे नियम पाळणे आपले कर्तव्ये आहे.
११. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाबाबत काही अडीअडचणी असल्यास ग्रंथपालांना समक्ष भेटावे.

# प्रयोगशाळा नियम

१. प्रयोगशाळा प्रात्यक्षिकासाठी नियमित आणि वेळेवर उपस्थित रहावे. गैरहजर विद्यार्थ्यांना पुन्हा प्रात्यक्षिकासाठी शुल्क अधिक वीस रुपये दंड भरावा लागेल.
२. प्रयोग करताना साहित्य अतिशय काळजीपूर्वक हाताळणे. गॅस, वीज, रसायने इत्यादी काटकसरीने वापरावी.
३. सर्व प्रयोगांना हजर राहून वेळोवेळी जर्नलस् पूर्ण करावीत.
४. प्रयोग करताना प्रयोग शाळेतील उपकरणाचे नुकसान झाल्यास विद्यार्थ्यांकडून भरपाई करुन घेतली जाईल.
५. प्रयोग शाळेतील प्रात्यक्षिकांत विभाग प्रमुखांनी घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

**ए.टी.के.टी. (A.T.K.T.) विषयक नियम**

**अ) कला शाखा**

१) प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात प्रवेश घेताना प्रथम वर्षामधील १२ कोअर कोर्स पैकी १० विषयांमध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**टिप :–** पदवी पुर्ण करण्यासाठी तृतीय वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्याने १३२ क्रेडीट्स अर्जित करणे आवश्यक आहे.

**ब) विज्ञान शाखा**

१) प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात प्रवेश घेताना प्रथम वर्षामधील ५०% क्रेडीट्स अर्जित करणे आवश्यक आहे.
२) द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात प्रवेश घेताना द्वितीय वर्षामधील ५०% क्रेडीट्स अर्जित करणे आवश्यक व प्रथम वर्षामधील १००% क्रेडीट्स अर्जित करणे आवश्यक.

**टिप :–** पदवी पुर्ण करण्यासठी तृतीय वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्याने (१३२ + ८) इतर क्रेडीट्स अर्जित करणे आवश्यक आहे.

**परीक्षेत गैर प्रकाराबाबत शिक्षा**

कोणत्याही परीक्षेस कॉपी करणे, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या अवैध मार्गाचा अवलंब करणे, उत्तरपत्रिका पुरवणी व अन्य साहित्याची देवाण–घेवाण करणे, उत्तरपत्रिका पुरवणी फाडणे अथवा गहाळ करणे, प्रश्नपत्रिके वर मजकूर लिहिणे, परीक्षार्थी ऐवजी अन्य व्यक्तीने परीक्षा देणे इ. सर्व कृत्ये दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आली आहे.

या गुन्ह्यासाठी महाराष्ट्र शासन कायदा क्रमांक ३१/१९८२ कलम ६ अन्वये रु. ५००/– पर्यंत दंड अथवा सहा महिने सक्तमजुरीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

# ॲन्टी रॅगिंग कमिटी

महाविद्यालयाच्या परिसरात रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या १५/०५/२०१२ च्या पत्रानुसार महाविद्यालयाने ॲन्टी रॅगिंग कमिटी नेमली आहे.

प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल. प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला महाविद्यालयातून निष्कासित करण्यात येईल.

**रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यास खालील शिक्षेची तरतूद आहे.**

१) स्कॉलरशिप व इतर आर्थिक लाभ थांबविणे.

२) महाविद्यालयातून हाकालपट्टी करणे.

३) निकाल थांबवणे.

या संदर्भात ज्या विद्यार्थ्यांवर अशाप्रकारे अन्याय होईल त्यांनी वरील समितीच्या सदस्यांशी किंवा प्राचार्यांशी संपर्क साधावा. सदस्य व अध्यक्षांची नावे व फोन क्र. महाविद्यालयाच्या भित्ती फलकावर छापलेले आहेत.

**उच्च न्यायालयाने सूचित केल्याप्रमाणे महाविद्यालयात कोणत्याही प्रकारचा शारिरीक/मानसिक छळ किंवा रॅगिंगसारखा प्रकार घडल्यास विद्यार्थ्यांस त्याबद्दल स्पष्टीकरण देणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थ्यांने दिलेले स्पष्टीकरण असमाधनकारक असल्यास महाविद्यालय त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करु शकेल.**

# SCHOLARSHIPS & AWARDS

## वरिष्ठ महाविद्यालय विविध सवलतींची माहिती (ई.बी.सी. विभाग)

| विविध शुल्क सवलत व शिष्यवृत्त्या | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|
| १) भारत सरकार शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता) | मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थिनी मार्च / एप्रिल २०१५ परीक्षेत वरिष्ठ महाविद्यायात उत्तीर्ण होऊन प्रवेश घेतला असेल त्यांनी अर्ज करावयाचे आहेत. ही सवलत एकाच कुटुंबातील दोन अपत्यांना शिष्यवृत्ती मिळू शकते.मुलींसाठी संख्येचे बंधन नाही. उत्पन्न मर्यादा रु. ६५,२९१/– च्या आत (एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी.) रु. १,००,०००/– च्या आत (एस.सी. व एस.टी.करिता) | १) मागील परीक्षा पास झालेल्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित २ प्रती<br>२) इ. १२ वी शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित दोन छायाप्रती<br>३) आई/वडील पालक नोकरीस असल्यास कार्यालय प्रमुखाचा मागील वर्षातील (१–४–२०१७ ते ३१/३/२०१८) उत्पन्नाचा मूळ दाखला. (मूळ पगार + महागाईभत्ता + घरभाडे इ. सह)<br>४) नोकरीत नसल्यास तहसिलदार यांचा मुळ उत्पन्नाचा दाखला.<br>५) विद्यार्थ्याचा जातीचा दाखला दोन साक्षांकित सत्य प्रती<br>६) वडील हयात नसल्यास मृत्यूच्या दाखल्याची २ प्रती<br>७) आई,वडील विभक्त असल्यास प्रतिज्ञापत्र व इतर पुरावे (कोर्टाचे)<br>८) शैक्षणिक खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट<br>९) मागील वर्षी ज्या महाविद्यालयात सवलत घेतली तेथील मंजुरी आदेश क्रमांक<br>१०) दुसऱ्या जिल्ह्यातील असल्यास पूर्वीच्या जिल्ह्यातील मा.समाज कल्याण अधिकारी वर्ग १ यांचे प्रमाणपत्र |
| २) बी.सी.फ्री शीप (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी) | १) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एकवेळ नापास झालेल्यांना फी सवलत मिळते.<br>२) उत्पन्न मर्यादा वार्षिक रु. ६५,२९१/– च्या पुढे (एन.टी./एस.टी.सी.ओ.बी.सी.) एस.एस.सी. विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/– च्या पुढे<br>३) तीन किंवा तीन पेक्षा जास्त अपत्य असल्यास लाभ मिळणार नाही. | वरीलप्रमाणे २ प्रती |
| ३) एकलव्य आर्थिक सहाय्य योजना (फक्त पदव्युत्तर वर्गासाठी) | पदवी परीक्षेत कला व वाणिज्य शाखेत किमान ६०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेला व विज्ञान शाखेत ७० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा.<br>पदव्युत्तर वर्गातील आर्थिकदृष्टचा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती | १) विहीत नमुन्यातील फॉर्म<br>२) पदवी परीक्षेचे गुणपत्रक व<br>३) तहसिलदार यांचे सहीचा सन १०–११ उत्पन्न दाखला (पालकांचा)<br>४) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र (डॉमिसिल) (स्वत:चे व वडिलांचे)<br>५) भारताचे नागरीक असल्याचे प्रमाणपत्र (नॅशनॅलिटी) (स्वत:चे व वडिलांचे)<br>६) विहीत नमुन्यातील पान क्र. ४ वर नोटरी पब्लिक यांचा सही व शिक्का |

# विविध शिष्यवृत्ती माहिती

| विविध शुल्क सवलत व शिष्यवृत्त्या | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|
| ४) अहिंदी शिष्यवृत्ती | एच.एस.सी. ते पदवीपर्यंत हिंदी विषय घेतलेला असावा किमान ६०% असावेत. | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) एच.एस्सी. ते पदवीपर्यंत गुणपत्रकाच्या प्रत्येकी २ छायाप्रती |
| ५) राज्य सरकाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | एच.एस.सी.परीक्षेत किमान गुण ७५% असावेत. या शिष्यवृत्तीचा लाभ तीन वर्षासाठी असतो.<br>उत्पन्न मर्यादा वार्षिक रु. १२,००० | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रकाच्या दोन साक्षांकित छायाप्रती<br>३) उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांचे सहीचा सन २०१७–१८ |
| ६) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (पदवीपर्यंत) | एच.एस.सी.परीक्षेत किमान गुण ७५% असावेत. या शिष्यवृत्तीचा लाभ तीन वर्षासाठी असतो.<br>उत्पन्न मर्यादा वार्षिक रु. ३५,०००/– च्या आत असावे. अशा विद्यार्थ्यांची एच.एस.सी. बोर्ड निवड करते. त्याप्रमाणे फॉर्म महाविद्यालयात उपलब्ध होतासत. आणि ज्या महाविद्यालयात एच.एस.सी. परीक्षा दिली तेथून फॉर्म भरावा. | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रकाच्या दोन साक्षांकित छायाप्रती<br>३) उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांचे सहीचा सन २०१७–१८ |
| ७) अपंग शिष्यवृत्ती | जो विद्यार्थी ४० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व आलेले असेल त्यांना फॉर्म भरता येईल. उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात आली असून उत्पन्न दाखला मा.तहसिलदार यांचा सहीचा असावा. | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रकाच्या दोन साक्षांकित छायाप्रती<br>३) उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांचे सहीचा सन २०१७–१८<br>४) जिल्हा वैद्यकीय अधिकारी (सिव्हील सर्जन) यांचेकडील दिलेले अपंग प्रमाणपत्र दोन साक्षांकित प्रती |
| ८) क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती | एन.टी.,एस.बी.सी.,ओ.बी.सी. | १) विहीत नमुन्यातील अर्ज शिष्यवृत्ती विभागाकडून एम.सी.ए., बी.एस.सी., जैवतंत्रज्ञान |
| ९) ''सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थिनी शिष्यवृत्ती योजना'' | एस.सी.,एन.टी.,ओ.बी.सी. | १) विहीत नमुन्यातील अर्ज शिष्यवृत्ती विभागाकडून एम.सी.ए., बी.एस.सी., जैवतंत्रज्ञान |
| १०) ''आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थ सहाय्य योजना'' | एस.सी.,एन.टी.,ओ.बी.सी. | १) विहीत नमुन्यातील अर्ज शिष्यवृत्ती विभागाकडून<br>एम.सी.ए., बी.एस.सी., जैवतंत्रज्ञान |

## FEES & CAUTION MONEY TO BE PAID AT THE TIME OF ADMISSION 2020-21

### FEES FOR PAYING NON GRANT [U.G.] STUDENTS

Ref. : 1] GR. 140/2001. Date - 15/5/2001. 2] (Law /2002 / 365) 30/10/2002 3] PGS/ 579 dt. 21.5.2008 4] PGS/7852 dt. 23/12/2009 5] PGS/542, dt. 17/2/2011 6] PGS/1289 dt. 11.05.2013 7] PGS /1951 dt. 19.6.12 8] PGS /2868 dt. 17/8/12

| CLASS | Admission Fees | Tuition Fees | Gathering /Prize Dist./ Card/ Test/Tutorial/ Magazine | Library Fee | Gymkhana Fee | Student Aid Fund | Eligibility Fee | Pro-rata Ashwamegh | Student Welfare Fund | Disaster Management | Medical Fee | Lab /Lib. Deposit | Laboratory | Vehicle Charges | Handbook | Computerization Fee | Dev. Fund | Equipment Maint. Charges | Internet Fee | Student Safety Insurance | Env. Aware. Fee | Registration Fee | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| F.Y.B.A. | 20 | 3900 | 900 | 100 | 100 | 10 | 300 | 40 | 50 | 20 | 60 | 300 | 0 | 125 | 50 | 30 | 125 | 0 | 0 | 10 | 0 | 25 | 6165 |
| S.Y.B.A. | 20 | 3900 | 900 | 100 | 100 | 10 | 0 | 40 | 50 | 20 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 30 | 125 | 0 | 0 | 10 | 240 | 25 | 5695 |
| T.Y.B.A. | 20 | 3900 | 900 | 100 | 100 | 10 | 0 | 40 | 50 | 20 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 30 | 125 | 0 | 0 | 10 | 0 | 25 | 5455 |
| F.Y. B.Sc | 20 | 5200 | 900 | 100 | 100 | 10 | 300 | 40 | 50 | 20 | 60 | 400 | 9200 | 125 | 50 | 30 | 125 | 2000 | 0 | 10 | 0 | 25 | 18765 |
| S.Y.B.Sc. | 20 | 5200 | 900 | 100 | 100 | 10 | 0 | 40 | 50 | 20 | 0 | 0 | 9200 | 125 | 0 | 30 | 125 | 2000 | 0 | 10 | 240 | 25 | 18195 |
| T.Y.B.Sc. | 20 | 5200 | 900 | 100 | 100 | 100 | 0 | 40 | 50 | 20 | 0 | 0 | 9200 | 125 | 0 | 30 | 125 | 2000 | 0 | 10 | 0 | 25 | 17955 |

**NOTE :** 1] The Students from the states other than the State of Maharashtra shall be charged double tuition fees and laboratory fees.

## FEES & CAUTION MONEY TO BE PAID AT THE TIME OF ADMISSION 2020-21

### FEES FOR BCS /BCR /STUDENTS NON GRANT [U.G.] STUDENTS

Ref. : 1] GR. 140/2001. date - 15/5/2001. 2] Law /2002 / 365, 30/10/2002 3] PGS/ 579 dt. 21.5.2008 4] PGS/7852 dt. 23/12/2009 5] PGS/542, dt. 17/2/2011 6] PGS/1289 dt. 11.05.2013 7] PGS /1951 dt. 19.6.12 8] PGS /2868 dt. 17/8/12

| CLASS | Admission Fees | Tuition Fees | Gathering /Prize Dist./ Card/ Test/Tutorial/ Magazine | Library Fee | Gymkhana Fee | Student Aid Fund | Eligibility Fee | Pro-rata Ashwamegh | Student Welfare Fund | Disaster Management | Medical Fee | Lab /Lib. Deposit | Laboratory Fee | Vehicle Charges | Handbook | Computerization Fee | Dev. Fee | Equipment Maint. Charges | Internet Fund | Student Safety Insurance | Env. Aware. Fee | Registration Fee | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| F.Y.B.A. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 300 | 0 | 125 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 475 |
| S.Y.B.A. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 |
| T.Y.B.A. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 |
| F.Y.B.Sc. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 400 | 0 | 125 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 575 |
| S.Y.B.Sc. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 |
|  | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 125 |

**NOTE :** 1] The Students from the states other than the State of Maharashtra shall be charged double tuition fees and laboratory fees.

२) सदर कॅटॅगरीमधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम शासनाने विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा केली असेल. तर सदर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची फी महाविद्यालयात जमा करावी.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.

## महाविद्यालय विकास समिती

## (College Development Committee)

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा.श्री. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पाटील | संस्थेचे अध्यक्ष |
| २. | मा.श्री. गेणुजी दगडूजी खानदेशे | संस्थेचे सचिव |
| ३. | मा.श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे | सामाजिक प्रतिनिधी |
| ४. | मा.अॅड. विश्वासराव दत्तात्रय आठरे | सामाजिक प्रतिनिधी |
| ५. | मा.डॉ. विवेक प्रभाकर भापकर | सामाजिक प्रतिनिधी |
| ६. | मा.श्री. मुकेश माधवराव मुळे | सामाजिक प्रतिनिधी |
| ७. | प्रा.डॉ. दगडु सखाराम तळुले | विभाग प्रमुख |
| ८. | प्रा.डॉ. अर्चना कांतिलाल आढाव | शिक्षिका प्रतिनिधी |
| ९. | प्रा. राजेंद्र लक्ष्मण गोरे | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | प्रा. संदिप संपत भणगे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | श्री. प्रितम विजय म्हस्के | शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी |
| १२. | प्रा. रविराज भानुदास सुपेकर | IQAC समन्वयक |
| १३. | कु. सोनाली जालिंदर राऊत | विद्यार्थी परिषद अध्यक्ष |
| १४. | कु. रेवती सुभाष निसाळ | विद्यार्थी परिषद सचिव |
| १५. | डॉ. सुरेश जनार्दन बाबर | प्राचार्य |

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.

## विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता

## (Code of Conduct for Students)

महाविद्यालयाचे शिस्त व अनुशासन विषयक नियम खालील प्रमाणे आहेत.या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांस विद्यापीठ नियमाप्रमाणे शासन केले जाईल सुचना, दंड किंवा महाविद्यालयातून निलंबित करण्यासंबंधीची कारवाई करण्यात येईल. विद्यापीठाच्या संकेतानुसार प्राचार्यांना विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीविषयी कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्तीच्या नियमाचे पालन करुन शांततामय वातावरण ठेवण्यास मदत करावी.

२) विद्यार्थ्यांची महाविद्यालयात नियमित उपस्थिती आवश्यक आहे. किमान ७५% उपस्थिती असेल तरच विद्यार्थ्यांस विद्यापीठ परीक्षांना उपस्थित राहता येईल.

३) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात कोणतेही बेकायदेशीर वर्तन करु नये.

४) महाविद्यालयातील अन्य विद्यार्थ्यांना त्रास होईल अशा पध्दतीने आवाज करणे, गोंधळ करणे, अनावश्यक प्रश्न विचारणे या बाबी टाळाव्यात.

५) महाविद्यालयातील फर्निचर, प्रयोगसाधने, पुस्तके, संगणक इ. साहित्य अत्यंत काळजीपूर्वक वापरावे आणि या साधनांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) महाविद्यालयातील सूचना फलक नियमितपणे पाहावा आणि त्यावरील सुचनांचे काटेकारपणे पालन करावे.

७) महाविद्यालयीन कामकाज सुरु असताना महाविद्यालय परिसरात गोंधळ करु नये.

८) महाविद्यालयाने ठरविलेले शुल्क तसेच कोणत्याही प्रकारचे थकीत शुल्क वेळच्यावेळी भरावे.

९) महाविद्यालयातील चाचणी परीक्षा, सत्र परीक्षा यासाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अन्यथा योग्य तो दंड आकारला जाईल.

१०) परीक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारचे अवैध वर्तन (कॉपी करणे, फोन करणे इ.) करु नये.

११) आपल्यापेक्षा ज्युनिअर विद्यार्थ्यांचा कोणत्याही प्रकारचा मानसिक छळ अथवा रॅगिंग करु नये.

१२) महाविद्यालयातील अध्यापकांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्रास होईल असे वर्तन करु नये.

१३) महाविद्यालयीन परिसरात पान, गुटखा, तंबाखू, च्युईंगम, धुम्रपान इ. बाबी निषीध्द आहेत. तसे आढळून आल्यास अत्यंत कडक कारवाई करण्यात येईल.

नॅक मार्गदर्शनाच्या भेटी प्रसंगी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष मा.नंदकुमार झावरे पा., सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.विश्वासराव आठरे पा., खजिनदार मा.मुकेशदादा मुळे व प्राचार्य डॉ.सुरेश बाबर





नॅक पीअरटीम कडून रिपोर्ट स्विकारताना चेअरमन डॉ.सितिकांता मिश्रा, समन्वयक डॉ.प्रविण सिंघ बिस्ट, सदस्य डॉ.स्वेबर्ट डिस्लीवा व प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, समन्वयक प्रा.रविराज सुपेकर

नॅक कडून प्राप्त 'बी' ग्रेड मिळाल्यानंतर आयोजित आनंदोत्सव कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे व कार्यक्रम प्रसंगी उपस्थित खजिनदार मा.मुकेशदादा मुळे, जिल्हा परिषद सदस्य मा.बाळासाहेब हराळ, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व IQAC समन्वयक प्रा.रविराज सुपेकर







भूगोल उद्यान उद्घाटन करताना संस्थेचे खजिनदार मा.मुकेशदादा मुळे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, भूगोल विभाग प्रमुख प्रा.साठे जी.एम., उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळुले व प्राध्यापक

## SALIENT FEATURES

- Modern, Well-equipped, Spacious Library building having rich collection of books, journals, magazines & periodicals, Reading Hall facility.
- Sophesticated science laboratories
- Special guidance for promotion of competitive examinations.
- National Service Scheme having capacity of 50 students.
- Well-maintained playground and Gymkhana Hall & Equipments for Indoor & Outdoor Games.
- Wi-Fi Campus and Library
- Effective implementation of 'Earn and Learn Scheme for the needy Students Various
- Scholarships and concessions to the Students.
- Personal attention and extra coaching Employment Guidance Centre
- Special Facilities for Physically Handicaps and Players on National Level Sports Activities

## - कार्यालयीन संपर्क -

| | | |
|---|---|---|
| डॉ. सुरेश बाबर | एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच.डी. | प्राचार्य |
| श्री. खैरे एन.एम. | एम.बी.ए. (आय.टी.) | कनिष्ठ लिपिक |
| श्री. पी.व्ही.म्हस्के | बी.कॉम. | कनिष्ठ लिपिक |
| श्रीमती माने ए.एस. | बी.ए. एम.लिब. | ग्रंथपाल |
| श्री. एम.ए.हराळ | बी.एस्सी. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| श्री. ओ.पी.गोरे | बी.एस्सी. | प्रयोगशाळा परिचर |

### - कार्यालयीन वेळ -

सोमवार ते शुक्रवार - सकाळी १०.३० ते ०१.३० व

भोजन वेळ - ०१.३० ते ०२.३०

दुपारी - ०२.३० ते ०५.३०

शनिवार - सकाळी १०.३० ते ०२.३०

## WARNING

Circular No. 170/2009 Dt. 21/5/2009 under ref. No. SW/1429/09 from the Registrar, University of Pune. It is hereby for information of all concerned that in view of the judgement and order dated 11/02/2009 of the Hon'ble Supreme Court of India in the matter of the University of Kerala V/s. the council of Principals of College in Kerala and others, if any incident of ragging comes to the notice of Anti Ragging Committee the accused students will be given an opportunity to explain and if his/her explanation is not satisfactory the college authority would expel him/her from the college. Date : 26/05/2009
Number of cases of ragging and punishment during the year 2018-19...NIL